महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६
दूरध्वनी क्रमांक (०२०) २५६५६२३४, Web : www.ropune.org.in Email : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्रः तंशिविकापु/आस्था-३(अ)/घरबांधणी/२०२४/ 3713 दिनांक : 06 SEP 2024

**परिपत्रक –**

**विषय- घराचे मूळ दस्तऐवज आपल्या स्तरावर जतन करून घेणेबाबत..**

संदर्भ- मा.संचालक, मुंबई यांचे पत्र क्र. १६/आस्था/घरबांधणी/मूळ कागद पत्र/२०२४/१६७, दिनांक ०२/०९/२०२४.

उपरोक्त संदर्भाकिंत पत्राच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय (पदवी/पदवीका) संस्थेतील वर्ग १ ते वर्ग ४ अधिकारी/कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.घबांअ-२०२३/प्र.क्र.३१/२०२३/विनियम, दिनांक ०१/०३/२०२४ च्या निर्देशानुसार ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यात येते त्यांना ज्या आस्थापनावरून अग्रिमाची रक्कम प्रदान केली असेल त्यांच्या घराचे खरेदी संबधित मुळ दस्तावेज व गहाण खत त्या आस्थापनेच्या कार्यालय प्रमुखांनी जमा व जतन करून ठेवावे. तसेच कार्यालय प्रमुखांनी घरबांधणी अग्रिमाची रक्कम प्रदान केल्यानंतर एक महिन्याच्या आत सदर दस्तऐवज व गहाण खत जमा व जतन करण्यात यावे व त्याबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करावे. सोबत अवलोकनार्थ संचालनालयाची प्रत जोडली आहे.

सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांची स्वाक्षरी घ्यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेसाठी.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल-desk१६@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: ttp://www.dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

परिपत्रक

पत्र क्रमांक : १६/आस्था/घरबांधणी/मूळ कागद पत्र/२०२४/१६७
दिनाक : २ सप्टेंबर २०२४

प्रति,

१. सहसंचालक,
सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,

२. प्राचार्य,
सर्व शासकीय तंत्रनिकेतने आणि इतर तत्सम संस्था.

३. कुलसचिव,
सीईओपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे.

४. सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

५. प्राचार्य,
सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,

६. उपसचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ विभागीय कार्यालये, मुंबई / पुणे / छत्रपती संभाजीनगर / नागपूर.

विषय : घराचे मूळ दस्तावेएज आपल्या स्तरावर जतन करून घेण्याबाबत..
संदर्भ : शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.घबांअ-२०२३/प्र.क्र.३१/२०२३/विनियम, दिनांक ०१/०३/२०२४

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या अधिपत्याखालील असलेल्या सर्व शासकीय विभागीय कार्यालय पदवी /पदविका संस्था तसेच संचालनालयातील वर्ग १ ते ४ अधिकारी / कर्मचा-यांना घरबांधणी अग्रिम संचालनालयामार्फत मंजूर करण्यात येते.

संदर्भीय शासन निर्णयातील निर्देशानुसार ज्या अधिकारी / कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिम मंजूर करण्यात येते त्यांना ज्या आस्थापनावरून अग्रिमाची रक्कम प्रदान केली असेल त्यांच्या घराचे खरेदी संबधित मुळ दस्तावेज व गहाण खत त्या आस्थापनेच्या कार्यालय प्रमुखांनी जमा व जतन करून घेणे बंधन कारक आहे.

तरी सर्व कार्यालय प्रमुखांना सूचित करण्यात येते की, घरबांधणी अग्रिमाची रक्कम प्रदान केल्यानंतर एक महिन्याच्या आत सदर दस्तावेज व गहाण खत जमा व जतन करुन जतन करण्यात यावे, व त्याबाबत चे प्रमाणपत्र संचालनालयात सादर करण्यात यावे.

(डॉ.सुनिल भामरे)
सहसंचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत कार्यासन क्र ४ /१२ यांना योग्य कार्यवाहीकरिता